# पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे

## Pune metropolitan Regional Development Authority,Pune

पुणे महानगर

स.नं. १५२ – १५३, महाराजा सयाजीराव गायकवाड उद्योग भवन, औंध, पुणे – ४११०६७

S.No. 152-153, Maharaja Sayajirao Gaikwad Udyog Bhawan, Aundh, Pune – 411 067

Ph No. : 020- 259 33 344 / 356 / 333 / फोन. नं. ०२०- २५९ ३३ ३४४/ ३५६ / ३३३ Email: hqpmrda@gmail.com


## भोगवटा प्रमाणपत्र

**( मंजूर विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील नियम क्र.७.६ नुसार )**

**जा.क्र : DP/बीएचए/मौ.वाघोली/ग.नं.१२०४ ते १२०८ /प्र.क्र. ५५६/१७-१८/ दि.१४/०७/२०१८**

**प्रति,**

मे.सिया डेव्हलपर्स तर्फे भागीदार श्री. सचिन भंडारी

पत्ता- २०१, बि.ए.गेटवे, सकाळनगर गेट नं. १ जवळ, बाणेर रोड, औंध, पुणे- ०७

मौजे-वाघोली, तालुका-हवेली, जिल्हा-पुणे येथील ग.नं.१२०४ ते १२०८, क्षेत्र-२४५००.०० चौ.मी. या जागेवर इमारतीचे बांधकाम करण्यासाठी जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडील अकृषिक आदेश क्र. पमह/एनए/एसआर /८१९/१४, दि-१५/०९/२०१४ तसेच प्राधिकरणाकडील विकास परवानगी व प्रारंभ प्रमाणपत्र क्र. ५५६/१७-१८, दि-२१/११/२०१७ अन्वये आपणास परवानगी देण्यात आली आहे.

उपरोक्त परवानगी प्रमाणे आपण श्री.विकास अचलकर लायसन्स नं. CA/९४/१७६०६ परवानाधारक वास्तुविशारद/ स्ट्रक्चरल अभियंता/ सुपरवायझर यांच्या देखरेखीखाली इमारतीचे बांधकाम पूर्ण /अंशत: पूर्ण केले असलेबाबत व या इमारतींना भोगवटा प्रमाणपत्र मिळणेबाबत दि-०८/०६/२०१५ रोजी अर्ज केल्यावरुन आपणास खालील इमारतींना सोबतच्या परिशिष्ट ' ब ' मध्ये नमूद केलेले अटींस अधिन राहून भोगवटा करणेस संमती देण्यात येत आहे.

**उपयोगात आणावयाच्या इमारतीचे वर्णन**

| अ.क्र | इमारत | मंजूरीप्रमाणे | प्रत्यक्ष जागेवर | मजला | सदनिका क्र. | एकूण स. |
|---|---|---|---|---|---|---|
| I. | बी-टाईप | L.P. + U.P. + ११ मजले | L.P. + U.P. + ११ मजले | L.P. + U.P. | --- | ---- |
| | | | | पहिला | १०१ ते १०८ | ०८ |
| | | | | दुसरा | २०१ ते २०८ | ०८ |
| | | | | तिसरा | ३०१ ते ३०८ | ०८ |
| | | | | चौथा | ४०१ ते ४०८ | ०८ |
| | | | | पाचवा | ५०१ ते ५०८ | ०८ |
| | | | | सहावा | ६०१ ते ६०८ | ०८ |
| | | | | सातवा | ७०१ ते ७०३ व ७०६ ते ७०८ ( रे.ए.७०४, ७०५ ) | ०६ |
| | | | | आठवा | ८०१ ते ८०८ | ०८ |
| | | | | नववा | ९०१ ते ९०८ | ०८ |
| | | | | दहावा | १००१ ते १००८ | ०८ |
| | | | | अकरावा | ११०१ ते ११०८ | ०८ |
| | | | | एकूण सदनिका- | | ८६ |

मा. महानगर आयुक्त तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण पु म प्र वि प्रा

**महानगर आयुक्त,**
**तथा**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,**
**पुणे यांचे करिता**

**प्रत:- माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी.**

१) ग्रामसेवक, मौजे-वाघोली, ता-हवेली, जि-पुणे. यांना माहितीसाठी व घरपट्टी आकारणीसाठी.

पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरण, पुणे यांचेकडील दि३४/०७/२०१९रोजीचे पत्र क्र. ५५६/१७-१८ सोबतचे

## परिशिष्ट ' ब '

१) अर्जदार /सदनिका धारक/गाळे धारक यांना उक्त इमारतींमधील सामाईक जागा उदा. रेफ्युज एरिया, सामाईक पार्किंग, टॉप टेरेस इ. बंदिस्त करता येणार नाही. अथवा विकता येणार नाही. सदरचे क्षेत्र सर्व लोकांसाठी खुले ठेवणे अर्जदारांवर बंधनकारक राहील.

२) अर्जदार / सदनिका धारक यांना सदनिका लगतचा दोन मजले उंचीचा टेरेस बंदिस्त करता येणार नाही.

३) रेखांकनातील रस्ते, गटारे, खुली जागा इत्यादी अर्जदारांनी सदनिका वितरित करण्यापूर्वी जागेवर स्वखर्चाने व समाधानकारकरित्या विकसित करणे आवश्यक आहे.

४) उंच इमारतींच्या अनुषंगाने पुणे महानगरपालिकाचे मुख्य अग्नीशमन अधिकारी यांनी पत्र.क्र. FB/३७६६, दि-०१/१२/२०१८ अन्वये दिलेल्या अग्नीशमन नाहरकत प्रमाणपत्रातील अटीं व शर्तीची पुर्तता करणे अर्जदार/विकासक/जमीन मालक यांचेवर बंधनकारक राहील.

५) प्रमाणित विकास नियंत्रण आणि प्रोत्साहन नियमावलीमधील नियम क्र. ७.१ नुसार सदर प्रकल्पाचे बांधकाम विकास नियंत्रण नियमावलीनुसार करणेची तसेच भारतीय प्रमाणकानुसार सुरक्षिततेच्या सर्व निकषांचे पालन करुन नियोजित बांधकाम करणेची संपूर्ण जबाबदारी जमिनमालक/विकासक यांची असून प्रस्तुत प्रकरणी अर्जदार / जमीन मालक/ विकासक मे.सिया डेव्हलपर्स तर्फे भागीदार श्री. सचिन भंडारी यांनी रुपये- २००/- स्टॅम्प पेपरवर तसे नोटराईज्ड् हमीपत्र क्र. ४९०/२०१५ सादर केलेले आहे. त्यास अधिन राहून भोगवटा /अंशत: भोगवटा प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

६) बांधकाम मंजूरीच्या आदेशातील तसेच अकृषिक परवानगी आदेशातील सर्व अटीं व शर्ती अर्जदार/ विकासक/जमीन मालक यांचेवर बंधनकारक राहतील.

७) विषयांकित जागेतील उर्वरित इमारतींचे बांधकाम मंजूर नकाशानुसार पूर्ण करुन त्यास भोगवटा प्रमाणपत्र घेणे अर्जदार /मालक/ विकासक यांचेवर बंधनकारक आहे.

८) प्रस्तुत गृहप्रकल्पाकरिता आपण सादर केलेल्या प्रमाणपत्रात नमूद सक्षम प्राधिकरणाने /ग्रामपंचायतीने पिण्याच्या पाण्याचा पुरवठा न केल्यास या गृहप्रकल्पातील सदनिका हस्तांतरणापूर्वी पिण्याच्या पाण्याची आवश्यक ती पुर्तता स्वखर्चाने करणे अर्जदार /जमीन मालक/ विकासक यांचेवर बंधनकारक राहील.

मा. महानगर आयुक्त तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने

महानगर आयुक्त,
तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी
पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,
पुणे यांचे करिता